महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

==========================================================================

जावक क्रमांक – ६८९/२४ दिनांक :- १७ फेब्रुवारी, २०२५

प्रसिद्धिपत्रक

**सहमुख्य अधिकारी यांच्या दालनात पैसे उधळणे प्रकरण**

# म्हाडा उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांच्यातर्फे समिती गठीत

समितीने ११ अर्जदारांची पात्रता तपासून त्यांना संक्रमण गाळे वाटपसंबंधीचा तपशीलवार अहवाल येत्या पंधरा दिवसात देण्याचे निर्देश

मुंबई, दि. १७ फेब्रुवारी २०२५ :- मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी यांच्या दालनाबाहेर एका महिलेने पैसे उधळण्याचा प्रकार नुकताच घडला. याप्रकरणी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी समिती गठित केली असून या समितीने ११ अर्जदारांची पात्रता तपासून त्यांना संक्रमण गाळे वाटपसंबंधीचा तपशीलवार अहवाल येत्या पंधरा दिवसात सादर करण्याचे निर्देश आज दिले.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील विक्रोळी कन्नमवार नगर संक्रमण शिबिरातील चाळ क्रमांक १२, १३ व १४ या चाळींमधील गाळे जुने जीर्ण व वास्तव्याकरिता धोकादायक असल्याने पुनर्विकासासाठी सदर चाळीतील गाळयांच्या बदल्यात इतर संक्रमण शिबिरात पर्यायी स्थलांतर देण्याच्या मागणीसाठी ११ अर्जदारांनी अर्ज केला.

या अगोदर जुलै २०२०, मार्च २०२१, जून २०२१ व ऑक्टोबर २०२१ मध्ये कन्नमवार नगर विक्रोळी संक्रमण शिबिरातील जुन्या जीर्ण व धोकादायक चाळींमधील वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांना संभाव्य जीवित वित्त आणि टाळण्यासाठी मानवतेच्या दृष्टिकोनातून पुनर्विकास कार्यक्रमांतर्गत नव्याने बांधण्यात आलेल्या नवीन पुनर्रचित इमारतीत उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण यांच्या मान्यतेने पात्र/अपात्रतेच्या अधीन राहून तात्पुरते स्थलांतरण देण्यात आले आहे. सदर परिपत्रक केवळ सद्यस्थितीत वास्तव्यास असणाऱ्या भाडेकरू/ रहिवाशांना लागू आहे. सद्यस्थितीला नमूद ११ अर्जदार हे धोकादायक व जीर्ण संक्रमण गाळयांमध्ये वास्तव्यास नाहीत. त्यामुळे सदर प्रकरण हे धोरणात्मक असल्याने त्याला वरिष्ठांची मान्यता आवश्यक होती. पूर्वी संक्रमण शिबिरामध्ये घुसखोरांविरूद्ध मोहिमेअंतर्गत म्हाडामार्फत कार्यवाही करून संक्रमण शिबिरातील घुसखोरांचे गाळयांमधून निष्कासन करण्यात आले होते, या पार्श्वभूमीवर अर्जदारांच्या अर्जाची सखोल पडताळणी करणे आवश्यक आहे.

सदर प्रकरण हे वीस वर्षांपूर्वीचे असल्याने या ११ अर्जदारांना नवीन संक्रमण शिबिर का दिले गेले नसावे याची पडताळणी होणे गरजेचे आहे. करिता सदर बाब धोरणात्मक असल्याने उपाध्यक्ष

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या स्तरावर याबाबत आदेश होणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव पाठवण्यात आला.

तक्रारदार महिला या स्वतः बाधित नसून ११ अर्जदारांनी स्वतः या प्रकरणाचा पाठपुरावा करणे संयुक्तिक होते. मात्र, तसे न होता ११ अर्जदारांच्या वतीने संबंधित महिलेने या माध्यमातून प्रशासकीय यंत्रणेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या माध्यमातून सहमुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांना नाहक बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर प्रकरण हे २० वर्षांपूर्वीचे असून सहमुख्य अधिकारी पदावर संबंधित अधिकारी हे दीड वर्षांपूर्वी रुजू झालेले आहेत. मात्र, तक्रारदार महिलेने सदर प्रकरणांबाबत चुकीच्या पद्धतीने लक्ष वेधण्याचा प्रकार केला आहे. गेल्या दीड वर्षात उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळामध्ये पारदर्शक व गतिमान कारभार सुरू असल्याने या कारभाराला कुठेतरी अडथळा आणण्यासाठी सदर प्रकार असू शकतो.

सदर समिती गठीत झाल्यामुळे याबाबतचा अहवाल लवकरच प्राप्त होणार असून सदर अकरा अर्जदारांची पात्रता निश्चित झाल्यानंतर संक्रमण गाळेसंबंधी उचित निर्णय घेण्यात यावा, असे निर्देश म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले आहेत.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

D:\Documents\Press Release\24-2025 Money thrown outside chamber.docx

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==============================================================

Outward No. : 689/24 Dt. February 17, 2025

Press Release

# MHADA Vice President Sanjeev Jaiswal forms a committee to probe into the incident of money being thrown outside officer's chamber

The committee has been directed to verify the eligibility of 11 applicants and submit a report on the allotment of transit tenements within 15 days.

Mumbai, February 17, 2025 – MHADA VP and CEO Mr. Sanjeev Jaiswal, IAS, has instituted a committee to probe into the incident where a woman showered currency notes outside the chamber of the Joint Chief Officer of the repair and reconstruction board at the MHADA Headquarters.

Taking serious note of the matter, Mr. Jaiswal suggested that the committee would examine the eligibility of 11 applicants seeking transit tenements. The committee has been directed to submit a detailed report within 15 days.

The incident occurred in connection with demands for alternative accommodation by 11 applicants from Vikhroli Kannamwar Nagar's transit camp. These individuals had applied for tenements in place of the old, dilapidated, and unsafe structures in buildings numbered 12, 13, and 14, which were demolished as part of the redevelopment process.

MHADA has previously carried out temporary relocations for eligible residents of these dangerous structures under the redevelopment policy, ensuring their safety. Temporary transit accommodations were granted in July 2020, March 2021, June 2021, and October 2021 based on eligibility criteria. However, the 11 applicants in question were not residing in the affected structures at the time and had not been included in previous allocations. Given the complexities involved, a thorough verification of their claims was deemed necessary.

Since the matter holds policy implications, the committee will carefully assess the legitimacy of the applications. The review will also examine why these 11 individuals were not provided with transit accommodation earlier, despite their claims. Following the verification, a decision on their eligibility and subsequent allocation will be made based on MHADA's policies and regulations.

Notably, the woman involved in the cash-showering act is not one of the affected applicants but was allegedly attempting to exert pressure on the administration on their behalf. Such actions raise concerns over attempts to influence official procedures and misrepresent facts. Furthermore, efforts to malign senior officials, including the Joint Chief Officer, despite their tenure being relatively recent, are being viewed with seriousness.

Under the leadership of Mr. Sanjeev Jaiswal, the authority has undertaken transparent and structured redevelopment efforts over the past 18 months. Any attempts to disrupt this process or manipulate administrative decisions will be scrutinized thoroughly.

With the committee now actively reviewing the case, MHADA assures that a fair and transparent decision will be taken following the verification process. The findings of the inquiry will guide the next course of action regarding the allotment of transit tenements to the 11 applicants.

###

Chief Public Relations Officer, MHADA

--

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial